# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5वी), फेब्रुवारी 2017

**बैठक क्र.** | | | | | | | | | | |

# 0101

**Set D**

**प्रश्नपत्रिका क्र. I** — **माध्यम : मराठी** — **वेळ : स. 11.00 ते दु. 12.30**

**पृष्ठ : 32** — **प्रथम भाषा व गणित** — **एकूण गुण : 150**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **25** प्रश्न व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **50** प्रश्न असे एकूण **75** प्रश्न आहेत. **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.


(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठीची क्रमगत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तुळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा.

उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.

प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर लिहिल्यास 'शून्य' गुण दिले जातील.



(6) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या शाईच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे आपले लेखी निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे न पाठवता थेट परीक्षा परिषदेकडे मा. आयुक्त, यांचे नावे समक्ष/टपालाने/ई–मेलने पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे लेखी निवेदन पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील. मुदतीच्या अंतिम दिनांकापर्यंत परिषदेस प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांचीच दखल घेतली जाईल.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार तो रद्द केला जाईल.

# विभाग I

## प्रथम भाषा

**1.** पुढीलपैकी जोडशब्द नसलेला पर्याय कोणता ?

(1) हालहवाल (2) शेतीवाडी

(3) पाऊसपाणी (4) मनोमनी

**2.** पुढील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य समूहदर्शक शब्दाचा पर्याय निवडा :

राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यासाठी सैनिकांचे .......................... तयार होते.

(1) गट (2) जथा

(3) पथक (4) झुंड

**3.** खाली दिलेल्या अक्षरांपासून पाचअक्षरी अर्थपूर्ण शब्द बनवल्यास त्या शब्दाच्या कितव्या क्रमांकाची अक्षरे घेतल्यास 'श्रद्धा' या अर्थाचा शब्द तयार होईल ?

भा जा व बा र

(1) '1ल्या' व '3ऱ्या' (2) '1ल्या' व '5व्या'

(3) '2ऱ्या' व '4थ्या' (4) '4थ्या' व '5व्या'

4. खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ पर्यायांमधून निवडा :

प्रतिपक्षाने हार मानताच विजयश्रीचा हार रमेशच्या गळ्यात पडला.

(1) माळ
(2) पराभव
(3) दागिना
(4) ओझे

5. 'ग्रामगीता' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(1) संत ज्ञानेश्वर
(2) संत गाडगेबाबा
(3) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
(4) संत तुकाराम महाराज

**प्र. 6 ते 8 साठी सूचना :**

**खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा :**

कृष्णेचे कुटुंब भलेमोठे आहे. कितीतरी लहानमोठ्या नद्या तिला येऊन मिळतात. गोदावरीप्रमाणेच कृष्णेलाही महाराष्ट्रमाता म्हणता येईल.

नरसोबाच्या वाडीला जात असताना गाडी नावेवर चढवून आम्ही कृष्णा पार केली होती. ते कृष्णेचे दुसरे दर्शन. एका बाजूला उंच दरड आणि दुसऱ्या बाजूला दूरवर पसरलेला गाळाचा विस्तार व त्यात होणारी वांगी, काकड्या, कलिंगडे, टरबूजे यांचे अमृतमळे. कृष्णाकाठाची ती वांगी ज्याने एकदा चाखली, की त्याला वारंवार खावीशी वाटतील. सतत एक-दोन महिने सारखी वांगीच खात राहिलो तरीही तृप्ती होणार नाही. मग वीट येणे दूरच राहिले.

**6.** 'महाराष्ट्रमाता' कोणत्या नदीला म्हणतात ?

(1) कृष्णा (2) वेण्णा

(3) कोयना (4) गोदावरी

**7.** कृष्णा नदीच्या गाळात कशाचे अमृतमळे फुलतात ?

(अ) काकड्या

(ब) टरबूजे

(क) कलिंगडे

(1) (अ), (ब) आणि (क) (2) फक्त (अ) आणि (ब)

(3) फक्त (ब) आणि (क) (4) फक्त (अ)

8. पुढीलपैकी कोणत्या अर्थाचा वाक्प्रचार उताऱ्यामध्ये आलेला **नाही** ?

(1) मन न भरणे (2) पूर्ण करणे

(3) कंटाळा येणे (4) चव घेणे

**प्र. 9 ते 11 साठी सूचना :**

**खालील कविता वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा :**

लहान, सुंदर, गोजिरवाणी दिसे कशी ही खार

गुलगुलीत हे अंग मजेचे शेपूट गोंडेदार ॥१॥

लहान डोळे लुकलुक बघती, दृष्टी कितीतरी छान

खुटकन कोठे सहज वाजले, तरीही ऐकती कान ॥२॥

उभे करोनी शेपूट बैसे, ऐटीमध्ये फार

मालकीण की जणू रानाची दिसे अशी ही खार ॥३॥

काम करी ही आनंदाने, मधेच खेळे खेळ

दवडी नच ही मुळी कधीही फुकट आपुला वेळ ॥४॥

भारी अचपळ जरी असशी, गरीब तरी तू फार

येईन भेटायास वनी तुजला वारंवार ॥५॥

**9.** कवीला, खार 'रानाची मालकीण' केव्हा वाटते ?

(1) ती शेपटी उभारून ऐटीत बसते तेव्हा……

(2) आनंदाने काम करते तेव्हा……

(3) गोजिरवाणी दिसते तेव्हा……

(4) ती डोळे लुकलुक करून बघते तेव्हा……

**10.** वरील कवितेनुसार विशेषण व नाम यांची **चुकी**ची जोडी कोणती ?

(1) गुबगुबीत अंग (2) लहान खार

(3) लुकलुक डोळे (4) गोंडेदार शेपूट

11. कवितेतील 'अचपळ' या शब्दाचा अचूक अर्थ कोणता ?

(1) मंद (2) चंचल

(3) शांत (4) खोडकर

12. खाली दिलेल्या वाक्यामध्ये एकूण किती नामे आली आहेत ?

'सातपुडा डोंगराच्या परिसरातील होळी महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर प्रसिद्ध आहे.'

(1) पाच (2) सात

(3) सहा (4) चार

13. खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे योग्य लिंग कोणते ?

'पिंपळाची <u>पाने</u> तरंगत तरंगत खिडकीतून आत आली.'

(1) स्त्रीलिंग (2) पुल्लिंग

(3) उभयलिंग (4) नपुंसकलिंग

**14.** खाली दिलेल्या वाक्यात कोणते विरामचिन्ह द्यावयाचे राहिले आहे ?

"का आम्ही आहोत की," साधना आणि जया एकदम बोलल्या.

(1) पूर्णविराम (2) प्रश्नचिन्ह

(3) स्वल्पविराम (4) उद्‌गारवाचक चिन्ह

**15.** पुढीलपैकी **अशुद्‌ध** शब्द असलेला पर्याय कोणता ?

(1) शिर्षक (2) कार्यक्रम

(3) भवितव्य (4) ऐटीत

**16.** खाली दिलेल्या वाक्यातील काळ ओळखा :

'कितीतरी वेळ मी ते पाहत उभी असायची.'

(1) भविष्यकाळ (2) भूतकाळ

(3) वर्तमानकाळ (4) साधाकाळ

**17.** पुढीलपैकी वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांची **अयोग्य** जोडी असलेला पर्याय कोणता ?

(1) रुंजी घालणे—भोवती फिरणे.

(2) कोसळणे—जोरात पडणे.

(3) झेंडू फुटणे—झेंडूला फुले येणे.

(4) धूम ठोकणे—पळून जाणे.

**18.** खाली दिलेल्या चौकटीतील अक्षरे जुळवून तयार होणाऱ्या म्हणीचा योग्य अर्थ कोणता ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ची | वी | वा | पो | |
| वी | त्या | वा | टा | ची | ज्या |
| | ळी | ळी | ज | खा | |

(1) पुष्कळ लोक बोलतात तेच खरे.

(2) अन्नदात्याशी कृतज्ञतेने वागावे.

(3) पैशाने सर्व कामे साध्य होतात.

(4) ज्याच्या अंगात सामर्थ्य तो इतरांवर अंमल गाजवतो.

**प्र. 19 ते 21 साठी सूचना :**

**खालील संवाद काळजीपूर्वक वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा :**

"स्नेहल, तू रांगोळी काढ."

"बाई, मी साक्षीला सोबत घेऊ ?"

"घे ना, पण लवकर काढा. फक्त तुम्ही दोघीच इथे आहात, बाकी सगळ्या आत हॉलमध्ये आहेत."

"अगं साक्षी, आजच्या स्नेहसंमेलनामध्ये विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम झाल्यावर आपल्या वर्गाचा गौरव होणार आहे."

"हो स्नेहल, कालच सरांनी सांगितलंय, आपल्यासाठी ही खूपच अभिमानाची गोष्ट आहे."

"साक्षी, अगं आपल्याच वर्गाची निवड कशी झाली ?"

"तुला माहीत नाही ! आपण 'लेक वाचवा' अभियानात पथनाट्य केलं होतं, त्यामुळे."

“अगं हो, त्यात अश्विनीनं सासूची भूमिका केली होती.”

“स्नेहल, झाली का तुमची कामं ? चला, कार्यक्रम सुरू होईल आता.”

“झालंच आहे बाई, साक्षीने बघा किती छान रंग भरलेत !”

“हो ! पाहुण्यांना पण आवडेल दारासमोरची रांगोळी.”

**19.** वरील संवादात किती जणांनी सहभाग घेतला असावा ?

(1) सहा (2) तीन

(3) पाच (4) चार

**20.** वरील संवादावरून शाळेत कोणता कार्यक्रम होणार **नाही** ?

(1) पथनाट्य (2) बक्षीस समारंभ

(3) विविध गुणदर्शन (4) स्नेहसंमेलन

**21.** वरील संवाद कोठे घडला असावा ?

(1) व्हरांड्यात (2) मैदानावर

(3) हॉलमध्ये (4) वर्गात

**22.** खाली दिलेल्या गटात माहिती-तंत्रज्ञानविषयक किती शब्द आहेत ?

मेसेज, चेअर, वेब, कॅमेरा, मोबाईल, टेबल

(1) पाच (2) सहा

(3) चार (4) तीन

**23.** पुढीलपैकी समान अर्थाच्या शब्दांची **चुकी**ची जोडी कोणती ?

(1) झणी-लवकर (2) अलगत-हळुवार

(3) कवन-कविता (4) वेल-कुंज

**24.** 'मंजुळ' या शब्दाचा योग्य विरुद्धार्थी शब्द पर्यायांतून निवडा :

(1) नाजूक (2) गोड

(3) कर्कश (4) मऊ

**25.** दिलेल्या चौकटीत अर्थपूर्ण शब्द तयार होण्यासाठी अनुक्रमे कोणती अक्षरे येतील ?

| | | | |
|---|---|---|---|
| अं | अं | अं | अं |
| | | | |
| ण | र | र | न |

(1) ग, जी, धा, ज (2) ज, ग, जी, धा

(3) ग, ज, धा, जी (4) ग, ज, जी, धा

# विभाग II


## गणित


**26.** $7.7 + 0.7 + 00.70 + 0.07 + 0.77 + 0.00007 = ?$


(1) 9.94007 (2) 99.4007


(3) 9.24707 (4) 9.2407

**27.** **चुकीचा** पर्याय कोणता ?

(1)  $= \frac{1}{4}$

(2)  $= \frac{1}{4}$

(3)  $= \frac{1}{4}$

(4)  $= \frac{1}{4}$

कच्च्या कामासाठी जागा

**28.** प्रदीपजवळ 100 रुपयाच्या नोटांच्या संख्येच्या पावपट नोटा 500 रुपयाच्या, निमपट नोटा 50 रु.च्या व दुप्पट नोटा 1 रुपयाच्या असे मिळून एकूण 10,080 रु. आहेत. तर प्रदीपजवळ 100 रुपयाच्या किती नोटा आहेत ?

(1) 20 (2) 30

(3) 40 (4) 50

**29.** 1 ते 100 संख्यांमधील सर्वात मोठी मूळ संख्या व सर्वात लहान विषम मूळ संख्या यांचा गुणाकार किती ?

(1) 194 (2) 291

(3) 198 (4) 293

**30.** $\frac{4}{7}, \frac{7}{4}, \frac{2}{28}, \frac{5}{14}$ यापैकी सर्वात लहान अपूर्णांक कोणता ?

(1) $\frac{4}{7}$ (2) $\frac{7}{4}$

(3) $\frac{2}{28}$ (4) $\frac{5}{14}$

**31.** $\frac{29}{8}$ हा अपूर्णांक खालीलपैकी कोणत्या अपूर्णांकाचा सममूल्य अपूर्णांक **नाही** ?

(1) $3\frac{5}{8}$ (2) $\frac{58}{16}$

(3) $3\frac{6}{8}$ (4) $\frac{290}{80}$

---


**कच्च्या कामासाठी जागा**

**32.** गौरीने चौदा हजार पाचशे रुपयास घेतलेल्या टी.व्ही. ला साडे तीनशे रुपये दुरुस्तीसाठी खर्च केले. नंतर तो टी.व्ही. सोळा हजार रुपयांना विकून टाकला, तर तिला या व्यवहारात नफा किंवा तोटा किती झाला ?

(1) 1,050 रु. नफा (2) 1,050 रु. तोटा

(3) 1,150 रु. नफा (4) 1,150 रु. तोटा

**33.**




वरील आकृतीत, वर्तुळावरील प्रत्येकी दोन बिंदू एकमेकांना जोडले, तर जास्तीत जास्त किती रेषाखंड काढता येतील ?

(1) 6 (2) 8

(3) 10 (4) 12

**कच्च्या कामासाठी जागा**

**34.** 1 ग्रोस कागदापैकी 5 दस्ते कागद छपाईसाठी वापरले, तर किती कागद शिल्लक राहिले ?

(1) 60 (2) 20

(3) 12 (4) 24

**35.** सायलीने मॅरेथॉनमध्ये 4 किमी. अंतर 10 मिनिटात पूर्ण केले, तर एका मिनिटात तिने किती अंतर कापले ?

(1) $\frac{4}{10}$ मी. (2) 800 मी.

(3) 400 मी. (4) 40 मी.

**36.** इष्टिकाचितीच्या पृष्ठे व कडांची संख्या यांची बेरीज ही घनाच्या कडा व शिरोबिंदूंच्या संख्येच्या बेरजेपेक्षा कितीने कमी अथवा जास्त आहे ?

(1) 2 ने कमी (2) 2 ने जास्त

(3) 6 ने कमी (4) 6 ने जास्त

**कच्च्या कामासाठी जागा**

**37.** 6 * 54 * ह्या संख्येस 9 ने नि:शेष भाग जात असेल, तर * च्या जागी कोणता अंक असेल ?

(1) 6 (2) 7

(3) 8 (4) 9

**38.** शबनमने तिच्या जवळ असलेल्या चॉकलेटपैकी 15% चॉकलेट जोसेफला दिले. जर तिने जोसेफला 30 चॉकलेट दिली असतील, तर शबनमजवळ एकूण किती चॉकलेट होती ?

(1) 90 (2) 150

(3) 60 (4) 200

**39.** राहुलने 15,000 रु. 3 वर्षांसाठी काही दराने संतोषला वापरायला दिले. संतोषने त्याला 4,500 रु. व्याज दिले, तर व्याजाचा दर द.सा.द.शे. किती असेल ?

(1) 10 (2) 15

(3) 9 (4) 8

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**40.** 24 च्या सर्व विभाजकांची बेरीज किती ?

(1) 59 (2) 36

(3) 60 (4) 66

**41.** मोठ्यात मोठी पाच अंकी संख्या व मोठ्यात मोठी दोन अंकी संख्या यांची बेरीज तीन अंकी लहानात लहान संख्येपेक्षा कितीने मोठी आहे ?

(1) 1,00,098 (2) 99,998

(3) 99,999 (4) 1,00,198

**42.** माधवचा जन्म गुरुवार दि. 15 जून, 2011 ला झाला. तर त्याच्या पाचव्या वाढदिवसादिवशी कोणता वार असेल ?

(1) मंगळवार (2) गुरुवार

(3) शनिवार (4) सोमवार

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**43.** $\frac{6}{10}$ या अपूर्णांकात $\frac{6}{10}$ किती वेळा मिळविल्यास बेरीज 3 येईल ?

(1) 5 वेळा (2) 3 वेळा

(3) 4 वेळा (4) 2 वेळा

**44.** 40,56,784 या संख्येतील 4 च्या स्थानिक किंमतीची बेरीज 5 च्या स्थानिक किंमतीपेक्षा कितीने जास्त आहे ?

(1) 40,00,004 (2) 39,50,004

(3) 39,50,000 (4) 40,50,004

**45.** 6363 ÷ 9 या उदाहरणात भाजक 2 ने कमी केल्यास भागाकार कितीने वाढेल ?

(1) 1 (2) 10

(3) 100 (4) 202

**कच्च्या कामासाठी जागा**

**46.** 5, 6, 7, 8, 9 हे अंक एकदाच वापरून अशी मोठ्यात मोठी 5 अंकी संख्या तयार करा की जिला 8 ने नि:शेष भाग जाईल.

(1) 79856 (2) 97658

(3) 97586 (4) 97856

**47.** 24 ताशी घड्याळाप्रमाणे क्रिकेटचा सामना 10 वाजता सुरू झाला व 16 : 45 वाजता संपला. सामना संपला त्यावेळी 12 ताशी घड्याळात किती वाजले असतील ?

(1) 5 : 45 (2) 4 : 45

(3) 15 : 45 (4) 2 : 45

**48.** 50 चा 50 टक्के किती ?

(1) 50 (2) 100

(3) 25 (4) 75

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**सूचना :— प्र. 49 व 50 साठी सूचना :**

**खालील चित्ररूप माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा :**

| **शाळेत येण्याचे साधन** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|
| पायी येणारे | △△△ |
| सायकल | △△△△ |
| रिक्षा | △△△△△△ |
| पालकांसोबत | △△ |

प्रमाण 1 चित्र = 50 विद्यार्थी

**49.** तक्त्यात एकूण किती विद्यार्थ्यांची माहिती दिली आहे ?

(1) 75 (2) 50

(3) 500 (4) 750

**50.** रिक्षाने येणारे विद्यार्थी सायकलने येणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीने जास्त आहेत ?

(1) 300 (2) 200

(3) 100 (4) 50

**कच्च्या कामासाठी जागा**

**51.** रोमन संख्या चिन्हानुसार M – D ÷ L = ?

(1) 10 (2) 90

(3) 8 (4) 990

**52.** साडे पासष्ट हजाराला घेतलेली गाडी चोपन्न हजाराला विकली, तर किती रुपये तोटा झाला ?

(1) ₹ 10,500 (2) ₹ 11,500

(3) ₹ 1,500 (4) ₹ 11,000

**53.** 970 रुपयात 50 ₹ च्या जास्तीत जास्त किती नोटा असू शकतील ?


(1) 17 (2) 18


(3) 19 (4) 20


---


**कच्च्या कामासाठी जागा**

**54.** खालीलपैकी कोणती आकृती पेंटोमिनो **नाही** ?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

**55.** 8 ऑक्टोबर 2016 ला जर दुसऱ्या शनिवारची शासकीय सुट्टी होती, तर चौथ्या शनिवारच्या सुट्टीच्या दिवशी कोणती तारीख असेल ?

(1) 22 ऑक्टोबर (2) 24 ऑक्टोबर

(3) 23 ऑक्टोबर (4) 20 ऑक्टोबर

**कच्च्या कामासाठी जागा**

**56.** 13 सेमी. लांबी व 5 सेमी. रुंदीचे दोन आयत परस्परांना रुंदीकडून जोडले, तर तयार होणाऱ्या आकृतीची परिमिती किती ?

(1) 67 सेमी.
(2) 130 सेमी.
(3) 72 सेमी.
(4) 62 सेमी.

**57.** सोडवा :

$$\left(\frac{15}{7}+\frac{6}{7}-\frac{2}{7}\right)-\frac{4}{7}=?$$

(1) $\frac{19}{7}$
(2) $\frac{19}{21}$
(3) $\frac{15}{7}$
(4) $\frac{23}{7}$

**58.** $b \times \frac{1}{8} = 8$, तर $b$ = किती ?

(1) 1
(2) 16
(3) 64
(4) 72

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**59.** रावसाहेबांच्या बागेत विविध प्रकारची 2100 झाडे आहेत. त्यापैकी 25% झाडे आंब्याची, 20% झाडे नारळाची, 40% झाडे फणसाची व उरलेली झाडे सुपारीची आहेत, तर सुपारीची एकूण किती झाडे आहेत ?

(1) 105 (2) 525

(3) 315 (4) 415

**60.** 42,000 मिलीमीटर लांबीची तार 6 ठिकाणी कापून समान लांबीचे तुकडे केले, तर प्रत्येक तुकड्याची लांबी किती ?

(1) 7 मीटर (2) 6 मीटर

(3) 600 मिलीमीटर (4) 700 मिलीमीटर

**61.** खालीलपैकी सर्वात मोठी संख्या कोणती ?

0.06, 0.6, 6.0, 0.006

(1) 0.06 (2) 0.6

(3) 6.0 (4) 0.006

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**62.** □ □ □

− ○ ○ ○

―――――

△ △ △

□, ○, △ च्या जागी अनुक्रमे कोणते अंक येतील ?

(1) 7, 3, 5 (2) 9, 4, 5

(3) 9, 7, 3 (4) 2, 1, 0

**63.** 4,97,998, 4,98,989, 4,97,889, 4,97,999 या संख्या उतरत्या क्रमाने लिहिल्या असता पहिल्या व तिसऱ्या संख्यांची बेरीज किती ?

(1) 996987 (2) 996988

(3) 996878 (4) 996888

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**64.** रोहितने साडे तीन रुपयाला एक पेन्सिल याप्रमाणे 3 डझन पेन्सिली विकत घेतल्या व त्या सर्व पेन्सिली 150 ₹ ला विकल्या, तर या व्यवहारात त्याला नफा किंवा तोटा किती झाला ?

(1) 120 ₹ नफा (2) 24 ₹ नफा

(3) 24 ₹ तोटा (4) 42 ₹ तोटा

**65.** सुशांतने 35 ₹ 5 पैसे ही रक्कम 35.5 अशी लिहिली, तर त्या दोन रकमांमध्ये किती फरक पडेल ?

(1) 45 पैसे (2) 55 पैसे

(3) 50 पैसे (4) काहीही फरक पडणार नाही

**66.** 855 मी. लांब व 205 मी. रुंद मापाचा भूखंड 400 ₹ चौ.मी. दराने विकला, तर भूखंडाची विक्री किंमत किती ?

(1) 17,62,750 ₹ (2) 7,01,10,000 ₹

(3) 7,05,110 ₹ (4) 7,05,10,000 ₹

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**67.** धनेशजवळ 50 ₹, 20 ₹, 10 ₹ व 5 ₹ च्या समान नोटा आहेत. एकूण रक्कम 1,020 ₹ असल्यास धनेशजवळ 50 ₹ च्या किती नोटा आहेत ?

(1) 50 (2) 12

(3) 68 (4) 34

**68.** खालीलपैकी **असत्य** विधान कोणते ?

(1) आयताचे सर्व कोन समान मापाचे असतात.

(2) आयताच्या सर्व बाजू समान मापाच्या असतात.

(3) चौरसाच्या लगतच्या बाजू एकमेकींना लंब असतात.

(4) चौरसाचे सर्व कोन काटकोन असतात.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**69.** स्वराने द.सा.द.शे. 7 दराने 20,000 ₹, 5 वर्षांसाठी बँकेत ठेवले, तर तिला किती व्याज मिळेल ?

(1) 5,000 ₹ (2) 700 ₹

(3) 7,000 ₹ (4) 500 ₹

**70.** नागपूर ते वर्धा आणि वर्धा ते नागपूर विनाथांबा बसच्या दिवसभरात 4 फेऱ्या पूर्ण झाल्या. बसमध्ये प्रत्येक वेळी 42 प्रवासी होते. बसचे तिकीट प्रत्येकी 85 ₹ असल्यास दिवसभराचे त्या बसचे एकूण उत्पन्न किती झाले ?

(1) 1,360 ₹ (2) 27,200 ₹

(3) 28,560 ₹ (4) 28,660 ₹

**71.** पंधरा कोटी पंधराशे पंधरा ही संख्या अंकात लिहा :

(1) 1,50,01,515 (2) 15,00,00,515

(3) 15,01,50,015 (4) 15,00,01,515

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**72.** 42 दशकातून 10 एकक वजा करून त्यात किती दशक मिळविले असता उत्तर 5 शतक येईल ?

(1) 90 (2) 9

(3) 180 (4) 18

**73.** 5 तास 35 मिनिटे = किती मिनिटे ?

(1) 535 (2) 95

(3) 300 (4) 335

**74.** खालील विधानापैकी **असत्य** विधान कोणते ?

(1) वर्तुळाचा व्यास त्रिज्येच्या दुप्पट असतो.

(2) वर्तुळाचा व्यास ही वर्तुळाची सर्वात मोठी जीवा असते.

(3) वर्तुळाची त्रिज्या व्यासाच्या निम्मी असते.

(4) एका वर्तुळात एक आणि एकच व्यास काढता येतो.

**75.** 85164 या संख्येमध्ये कोणती संख्या मिळविल्यास 6 अंकी लहानात लहान संख्या तयार होईल ?

(1) 14835 (2) 14836

(3) 14736 (4) 14735

---

**कच्च्या कामासाठी जागा**

कच्च्या कामासाठी जागा

कच्च्या कामासाठी जागा